# बिर्ला इन्स्टिट्यूटचा विद्यार्थ्यांसाठी अनोखा उपक्रम

## बिटस् पिलानी प्रॅक्टीस स्कुलच्या माध्यमातून इंटर्नशिप कार्यक्रमाचे आयोजन, कॅम्पसमधील १२४ विद्यार्थ्यांचा सहभाग

प्रतिनिधी
वास्को

बिर्ला इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी ॲण्ड सायन्सतर्फे बिटस् पिलानी प्रॅक्टीस स्कुलच्या माध्यमातून विद्यार्थ्यांसाठी अनोखा इंटर्नशिप कार्यक्रम आयोजित करण्यात आला. पीएस हा बिटस् पिलानीचा शैक्षणिक उपक्रम आहे.

या वर्षासाठी पीएस १ हा कार्यक्रम यशस्वीरित्या पूर्ण केल्याबद्दल एका महत्वपूर्ण बैठकीचे आयोजन केले होते. ज्यात उद्योग क्षेत्रातील कंपनीचे प्रतिनिधी तसेच पीएस १ मध्ये सहभागी झालेल्या प्राध्यापकांचा समावेश होता.

मुरगांव बंदर प्राधिकरण, गोवा शिपयार्ड लि., सिमेन्स इंडिया प्रा. लि., ट्युलिप ग्रुप ऑफ इंडस्ट्रीज, डॅनलॉ टेक्नॉलॉजीस इंडिया लि., पुत्झमेस्टर, स्मार्टलिंक होल्डिंग्स लि., पेंटेअर वॉटर इंडिया, सिनेग्रा, वॉक्व फूडस् आणि गोवा प्रकल्प व्यवस्थापन, गोवा सरकारच्या प्रतिनिधींनी या चर्चासत्रात भाग घेतला.

पीएस १ कार्यक्रमात राष्ट्रीय ध्रुवीय आणि महासागर संशोधन संस्था, राष्ट्रीय समुद्र विज्ञान संस्था या संशोधन संस्थांमधिल शास्त्रज्ञांनी बैठकीला उपस्थित राहून विचार मांडले.



सांकवाळ : बिटस् पिलानी कॅम्पसमध्ये आयोजित केलेल्या बैठकीत प्र. एस. पी. रेगाला, प्रा. सुमन कुंडू, प्रा. जी. सुंदर, प्रा. सचिन वायगावकर, प्राध्यापक, कंपनी व संस्थेचे प्रतिनिधी.

पीएस १ कार्यक्रम देशभरातील ३४७ कंपन्यांमध्ये ११० प्राध्यापकांच्या मार्गदर्शनाखाली २६२३ विद्यार्थ्यांसाठी आयोजित करण्यात आला होता. गोव्यात २६ उद्योग आणि संशोधन संस्थानी सात प्राध्यापकांच्या मार्गदर्शनाखाली बिटस्. पिलानीच्या तीनही भारतीय कॅम्पसमधिल १२४ विद्यार्थ्यांनी पीएस १ मध्ये भाग घेतला. गोव्यातील १३ प्राध्यापकांनी देशातील इतर ठिकाणीही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

प्रा. सुमन कुंडू यांनी उद्योगांनी दिलेल्या पाठिंब्याबद्दल तसेच सर्व विद्यापीठ संकुलातील सदस्यांनी केलेल्या सांघिक कार्याबद्दल सर्वांचे कौतुक केले. प्रा. सचिन वायगावकर यांनी पीएस विभागाचे डीन प्रा. एस. पी. रेगाला, बिटस् पिलानीच्या इतर सहयोगी संस्थेचे डीन, या विभागाचे संचालक प्रा. जी. सुंदर, गोवा कॅम्पसचे प्रा. सुमन कुंडू आणि पीएस विभागाचे कर्मचाऱ्यांचे आभार मानले.